# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक १९ /१२/२०१७**

**सायं ४.३० वा.**

| | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/११/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/११/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणेंत येत आहेत.<br>अनुमोदक :- (चंद्रकांत गोरीवले ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २. | प्रश्नोत्तरे | ठराव :- निरंक |
| ३. | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव. | ठराव :- महानगरपालिका सर्वसाधारण सभा कामकाज शासकीय पत्रव्यवहार विवरणपत्र |

| अनु. क्र. | सभा दिनांक | कोणत्या विभागाकडून प्राप्त | पत्रातील दिनांक | विषय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९/१२/२०१७ | महाराष्ट्र शासन, सामान्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक (शासन निर्णय) | ०६/१२/२०१७ | स्वातंत्र्य सैनिकांच्या युध्दात अपंग झालेल्या आणि सशस्त्र दलातुन निवृत्त झालेल्या जवानांचे पुनर्वसनासाठी कल्याणकारी योजना राबविण्यासाठी ध्वजदिन निधीचा विनियोग करणे. | - |
| २ | १९/१२/२०१७ | महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, नविन मंत्रालय, मुंबई ३२ (शासन निर्णय) | ०८/१२/२०१७ | प्रधानमंत्री मातृवंदना या योजनेची राज्यात अंमलबजावणी करणेबाबत. | - |

| | | |
|---|---|---|
| ४. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती एच नवघर-माणिकपूर आस्थापनेवरील कर्मचारी श्री नथू सुके जाधव सफाई कामगार यांना रुग्णता सेवानिवृत्त करणेबाबत.** | **ठराव /निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचारी श्री.नथू सुके जाधव, सफाई कामगार, प्रभाग समिती- एच, नवघर-माणिकपूर यांना दि.३१/१२/२०१७ रोजी मध्यान्होत्तर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चा नियम ६८ अन्वये रुग्णता सेवानिवृत्त करणेस मान्यता आहे. तसेच श्री.जाधव यांना रुग्णता सेवानिवृत्तीनंतर दयावयाचे अनुषंगिक लाभ अदा करणेस आजची ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (नितीन राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ५. | **वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-३ व वर्ग-४ मधील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील अनुशेष सरळ सेवेने भरणेसाठी महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाच्या "महापरिक्षा सेल" ची नेमणूक करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव/निर्णय :-** सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंसं-०८८/२७/२०१६-DIR IT (MH), दि. १९ सप्टेंबर, २०१७ अन्वये शासनाने सरळसेवा भरतीसाठी "महापरिक्षा" पोर्टल तयार केलेले असून दि.१/१०/२०१७ पासून राज्यातील सर्व सरळसेवा भरती प्रक्रिया शासनाच्या या पोर्टलवरुन करणे बंधनकारक केलेले आहे. शासनाच्या या दि. १९ सप्टेंबर,२०१७ च्या निर्णयाद्वारे यापूर्वी सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. प्रनिमः१२१४/ २८९/(प्र.क्र.१०८/१४)/१३-अ, दि. ११ मार्च, २०१५ मधिल मुद्दा क्र. १ ते७ अधिक्रमित केलेले आहेत. आता सरळसेवा भरतीसाठी महाराष्ट्र शासन व टाटा कन्सल्टंसी यांच्या संयुक्त उपक्रम मे. महाऑनलाईन लिमिटेड यांचेमार्फत कोणतीही भरती करता येणार नाही. त्यामुळे शासनाने नव्याने विकसीत केलेले "महापरिक्षा" या पोर्टलचा वापर करुन, वसई-विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-३ व वर्ग-४ मधील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील अनुशेष सरळ सेवेने भरणेसाठी येणाऱ्या खर्चास आजची ही सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे. मा. महासभा ठराव क्र. ७, दि. १४ ऑगस्ट, २०१७ अन्वये खुल्या प्रवर्गासाठी रु. ८००/- व राखीव प्रवर्गासाठी रु. ४००/- परिक्षा शुल्क आकारावे, असा निर्णय मा. महासभेने घेतला होता, तो या ठरावाद्वारे कायम ठेवण्यात येत आहे. मे. महापरीक्षा पोर्टल सेल यांचेकडून उपरोक्त सरळसेवा भरतीसाठी सर्व परीक्षा केंद्र ही पालघर जिल्ह्यातच ठेवली जातील, असे पहावे.<br>**अनुमोदक :- (नितीन राऊत) सुचक :- ((फ्रान्सिस डिसोजा (आपटे))**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६. | **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वॉर्ड कमांक ७७ मध्ये जानकीपाडा येथील आरक्षित दफनभूमीला संरक्षक भिंत बांधणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस** | **प्रस्तावाचा निर्णय/ठराव :-** वरील प्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन सदर कामाचे रक्कम रु.७८८३३०४/- च्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (सुनील आचोळकर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| | सुधारित प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. (आरक्षण क्र. ४८१/अ) | |
| ७. | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत विरार (प.) येथे परिवहन सेवेसाठी बस डेपो बांधणेकामी राजावळी, वसई पूर्व येथे बस डेपो बांधणेकामी ठेकेदाराने मागणी केलेली नुकसान भरपाई अमान्य करणे व डिस्पुट ॲडज्युडीकेशन (डी.ए.बी.) नियुक्त करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | प्रस्तावाचा निर्णय :- तरी सदर प्रकल्पासाठी ठेकेदाराने केलेली नुकसान भरपाईची मागणी अमान्य करून श्री. देशिंगकर, सेवानिवृत्त सचिव, सार्व. बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांची डिस्पुट ॲडज्युडीकेशन बोर्ड (डि.ए.बी.) म्हणून नियुक्ती करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे. सदर नियुक्तीकामी प्रत्येक बैठकीपोटी मानधन रक्कम रु.२५,०००/- पैकी ५० टक्के खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे, तसेच उर्वरीत ५०% रक्कम ठेकेदार मे.एन.ए.कन्स्ट्रक्शन प्रा.लि. ह्यांचेकडून घेण्यात यावी असे ही सभा ठरवित आहे.<br>अनुमोदक :- (भरत मकवाना) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

नगरसचिव

वसई विरार शहर महानगरपालिका